

# कुलगुरु प्रोफेसर बी. ए. चोपडे
## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

प्रोफेसर बी. ए. चोपडे हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे वैज्ञानिक आणि संशोधक म्हणून सर्वज्ञात आहेत त्यांनी सुक्ष्मजीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान, नॅनोटेक्नॉलॉजी या शाखामध्ये मुलभूत संशोधन करुन वैज्ञानिक जगामध्ये फार मोठी मोलाची भर घातलेली आहे. उज्वल भविष्याची स्वप्न पाहणारे, उच्च दर्जाची गुणवत्तापूर्ण संस्था व केंद्राची उभारणी करणारे संशोधन क्षेत्रातील नामवंत संशोधक आणि नवकल्पना राबवणारे उत्तम प्रशासक म्हणूनही त्यांची खास ओळख आहे. युरोप, अमेरिका मधील जागतिक किर्तीच्या विद्यापीठामध्ये संशोधनात्मक उच्च शिक्षण पुर्ण केल्यानंतर संपादित संशोधनाचा आपल्या ज्ञानाचा मातृभूमीस उपयोग करुन देण्यासाठी ते भारतात परतले व भारतातील विद्यापीठात निष्ठेने संशोधन व अध्यापन कार्य करुन एक मानदंड निर्माण केला. त्यांनी आतापर्यंत २९ विद्यार्थ्यांना पीएच.डी मार्गदर्शक म्हणून तर १० विद्यार्थ्यांना पोस्ट डॉक्टरल संशोधन मार्गदर्शक म्हणून कार्य केलेले आहे. सध्या ८ विद्यार्थी संशोधक म्हणून त्यांच्याकडे कार्यरत आहेत. सातत्याने संशोधनातून ज्ञानाची निर्मिती करणे व त्याचे अध्यापन करणे हाच त्यांचा पिंड आहे.

प्रोफेसर बी.ए. चोपडे दिनांक ०४/०६/२०१४ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात कुलगुरु म्हणून कार्यरत आहेत. या आधी त्यांनी सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथे सूक्ष्मजीवशास्त्र विभागात तीन वेळा विभागप्रमुख, सिनियर प्रोफेसर व विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत पुणे विद्यापीठामध्ये युनिव्हरसिटी ऑफ पोटेंशयल एक्सलंस (युपीई) प्रोग्रामच्या अंतर्गत पोटेंशियल एक्सलंस प्रोग्राम ( भाग १ व २) चे जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विषयाचे समन्वयक म्हणूनही मोलाचे कार्य केलेले आहे. सन २००६ ते २०१२ या कालावधीत त्यांनी इन्स्टिटयूट ऑफ बायोइन्फॉर्मेटिक्स आणि बायोटेक्नॉलॉजी चे संस्थापक संचालक म्हणून कार्य केले. या कालावधीत त्यांनी इन्स्टिटयूट ऑफ बायोइन्फॉर्मेटिक्स आणि बायोटेक्नॉलॉजी विभागात नविन उपक्रम , संशोधन व अध्यापनात देशातील सर्वोत्तम केंद्र म्हणून नावारुपास आणले. आय बी बी तील पदवी पातळीवरील विद्यार्थ्यांना सातत्याने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पीअर रिव्हूव्ड संशोधन नियतकालिकामध्ये उत्तम दर्जाचे संशोधन लेख प्रकाशित करुन भारतामध्ये व जगात एक उच्च मापदंड स्थापन केलेले आहे. सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सुक्ष्म जीवशास्त्र विभागात विभागप्रमुख म्हणून त्यांनी १९९४,१९९६-२००० आणि २००३-२००६ या कालावधीत कार्य केलेले आहे. ३५ वर्षाच्या कार्यकाळात संशोधन, लेखन, तसेच पदवी स्तरावर पहिल्यापासुनच संशोधनास प्राधान्य दिले. तसेच ५ वर्षाचा इंटिग्रेटेड एम.एस्सी प्रोग्राम (जैवतंत्रज्ञान व जैवमाहितीशास्त्र) व १ वर्षाचा एम.टेक प्रोग्राम (संशोधनावर आधारित) तयार केला. हा अभिनव प्रयोग भारतामध्ये सर्वप्रथम २००६ साली सुरु करण्याचा बहुमान त्यांना जातो. त्यांना नविन उपक्रम, अध्यापन आणि प्रशासनाचा पुणे विद्यापीठाचा प्रदिर्घ अनुभव आहे. पुणे

विद्यापीठातील आय बी बी येथे प्रशासकीय जाणीव, जबाबदारी, कार्यप्रती कटीबध्दता व कार्यातील पारदर्शकता याबाबत नवीन कार्यपध्दतीचा त्यांनी घालुन दिलेले आहेत.

प्रोफेसर बी. ए. चोपडे यानी भारत सरकारची नॅशनल ओव्हरसिन शिष्यवृत्ती मिळवून जगाप्रसिध्द असलेले नॉटिंगहॅम विद्यापीठ, इंग्लंड येथे सूक्ष्मजीवशास्त्र आणि मॉल्युक्युलर जेनेटिक्स या विषयात (१९८३-१९८६) या कालावधीत संशोधन करुन पी.एच.डी. मिळवली. विशेष म्हणजे भारताचे माजी राष्ट्रपती माननीय आर. के. नारयण यांना सुध्दा हिच स्कॉलरशिप मिळाली होती. तसेच भारताचे माझी नोबेल पारितोषक विजेते शास्त्रज्ञ डॉ. एरगोंविद खोराना यांना देखिल हिच स्कॉलरशिप मिळालेली होती. १९८३ साठी सबंध भारतातुन फक्त १० विध्यार्थ्यांना ही स्कॉलरशिप मिळाली हाती. त्यामधे डॉ. चोपडे प्रथम क्रमाकांवर होते. अमेरिकेतील शिकागो येथील इलिनॉईस विद्यापीठात १९९४-१९९६ या कालावधीत जेनेटिक इंजिनिअरिंग या विषयात अमेरिकन सरकारचे फोगार्टी इंटरनॅशनल रिसर्च स्कॉलरशिप अवॉर्ड त्यांना पोस्टडॉक्टरल संशोधनासाठी मिळालेल आहे. यासाठी सबंध जगातुन फक्त १० वैज्ञानिकांची निवड प्रगत केली जाते. संशोधनामधील त्यांच्या कार्याबदद्ल प्रोफेसर चोपडे यांचे नामांकन केले होते. १९८६ मध्ये त्यांना इंटरनॅशनल युनिअन ऑफ मायक्रोबायलॉजिक सोसायटीज(आययूएमएस) या आंतरराष्ट्रीय स्तरावरील सूक्ष्मजीवशास्त्र विषयाचा पुरस्कार मिळालेला आहे. त्यांची एकूणच कार्यकीर्द ही उच्चतम शैक्षणिक गुणवत्ता व अत्युत्कृष्ट ज्ञान संपादन या गोष्टीवर आधारलेली आहे. त्यांनी एलिस चे समन्वयक म्हणून ब्रिटीश कौन्सील ऑफ लंडन व सूक्ष्म जीवशास्त्र विभाग पुणे विद्यापीठ येथे (१९९४ ते १९९७) या कालावधीत कार्य केलेले आहे.

त्यांनी आतापर्यंत संशोधन करुन ११५ शोधनिबंध आंतरराष्ट्रीय दर्जाच्या व पीयर रिव्हूड कमिटी असलेल्या ६९ वेगवेगळया दर्जेदार आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालीकात प्रकाशित केलेले आहे. त्यांच्या सर्व पेपर्सचा एकूण इंपॅक्ट फॅक्टर २७५ असून त्यात एच-इंडेक्स,३० आणि आय १० इंडेक्स ६२ असा आहे. www.scholor.google.com वर त्यांनी प्रकाशित केलेले संशोधनाचा एकूण २६१८ वेळा जगभरातील इतर संशोधकांनी संदर्भ घेतला आहे. त्यांच्या निवडक १० संशोधन प्रबंधचा पेपर्सचा आंतरराष्ट्रीय ख्याती असलेल्या नियतकालीकामध्ये सरासरी इंम्पॅक्ट फॅक्टर ५.२ आहे आणि प्रत्येक पेपर सरासरी ६४.४ वेळा इतर संशोधकांनी संदर्भ घेतलेला आहे. त्यांच्या नावे अमेरिकेत २ व भारतात ७ पेटेंट आहेत. त्यांचे मुलगामी लेखन इ-डीएनए आणि असिनेटोबॅक्टर या सुक्ष्मजंतूमध्ये तयार होणारे व्हेसीकल्स तीन वेळा नेचर या इंग्लंड मधील जगविख्यात नियतकालीकात संदर्भ म्हणून वापरलेले आहे. स्टॅनफोर्ड विद्यापीठातील नोबेल पुरस्कार विजेते शास्त्रज्ञ ऑर्थर कॉर्नबर्ग यांनी त्यांचे संशोधन संदर्भ म्हणून अनेकवेळा उपयोग केलेला आहे. त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदेत १७० पेक्षा जास्त पेपर्सचे वाचन केलेले आहे व अनेक परिषदांमध्ये प्लीनरी लेक्चर्स दिलेले आहेत. जीन संक्रमण, प्लास्मीड बायोलॉजी मॉलीक्युलर, मायक्रोबायोलॉजी, नॅनोमायक्रोबायलॉजी, विषाणूशास्त्र, जैवतंत्रज्ञान, नॅनोजैवतंत्रज्ञान व नॅनोजैवतंत्रज्ञान व नॅनोऔषधी या क्षेत्रात त्यांनी मुलभूत संशोधन केलेले आहे. त्यांच्या ३ विद्यार्थ्यांना १९९३ मध्ये स्टॉकहोम येथे. इंटरनॅशनल कॉंग्रेस ऑफ केमोथेरपी प्रणीत आंतरराष्ट्रीय युवा पुरस्कार मिळालेला आहे. सिएसआर, नवी दिल्लीच्या वेल्थ ऑफ इंडिया या

प्रकाशन संस्थेच्या संपादक मंडळावर कार्यरत आहेत. तसेच वेगवेगळया आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त संशोधन नियतकालीकाच्या संपादक मंडळावर कार्यरत आहेत.

आता पर्यंत त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील वित्तीय संस्थांकडून १० कोटीपेक्षा जास्त संशोधन अनुदान प्राप्त केले आहे. त्यांनी या संस्थांमार्फत एकूण ३२ मेजर रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण केलेले आहेत. इन्फेक्स नावाचे त्यांनी तयार केलेले वनौषधाचे उत्पादन सृष्टी हर्बलसचे फार्मा लि. बेंगलोर गेल्या २० वर्षापासुन करत आहे. उद्योग व शिक्षण यांच्यातील आंतरक्रिया व सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योजकता याबाबत त्यांना आयबीबी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ येथील संशोधन हे या क्षेत्रातील अग्रदूताप्रमाणे आहे. शिक्षण व सामाजिक बांधिलकी बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील त्यांचे कार्य अद्वीतीय स्वरुपाचे असून ते भारतातील इतर विद्यापीठासाठी ही प्रेरणादायक, लाभदायक आहे. २०१४ पासून कुलगुरु म्हणून सूत्रे हाती घेतल्या पासून आजतागायत त्यानी सिएसआर प्रोग्राम अंतर्गत २५ कोटीपेक्षा जास्त रक्कम विद्यापीठ विकासकार्यासाठी मिळवण्यासाठी खूप प्रयत्न केलेले आहेत.

१९९० मध्ये त्यांनी पाश्चर इंस्टीटयूट, पॅरीस, फ्रान्स आणि किंग्ज कॉलेज, युनवर्सीटी ऑफ लंडन येथे अभ्यागत शास्त्रज्ञ म्हणून व्याख्याने दिलेली आहेत. त्यांना आतापर्यंत अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत त्यातील उल्लेखनीय म्हणजे एस. सी. एस. टी संसद सदस्य प्रणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार, २०१४ मध्ये तसेच जगतविख्यात इंटरनॅशनल जेनेटिक इंजिनिअर्स मशिनस् (आयजेएम) मॅसॅच्युसेट इंस्टीटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अमेरिका २००९ चा ब्रॉंझ मेडल, पुरस्कार, उंडाळकर फाउंडेशन कराड यांच्या वतीने दिला जाणारा प्रज्ञावंत पुरस्कार २०११, पुणे महानगरपालिका बेस्ट टिचर अवॉर्ड १९९३, मायक्राबियल व मॉलीक्यूलर जेनेटिक्स चा बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड १९८८ आणि २००२ असोशियशन ऑफ मायक्रोबायलॉजीस्ट ऑफ इंडियाच्या वतीने दिला गेला. इंस्टिटयुट ऑफ इंजिनिअर्सच्या वतीने वाडीया ओरेशन अवॉर्ड त्यांना २००८ मध्ये मिळाला. रिलायंस इंडीया मार्फत दिला जाणारा बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड त्यांना २००९ मध्ये प्राप्त झाला. इंडियन अकॅडमी ऑफ सायंसेस बंगलोरच्या वतीने २००१ मध्ये त्यांना समर फेलोशिप मिळालेली आहे, त्यांचे संक्षिप्त जीवनचरीत्र अमेरिकन बायोग्राफीकल इंस्टीटयुट ने २००० मध्ये प्रकाशित केलेले आहे. बायोग्राफीक सेंटर केंब्रीज यांनी १९९१ मध्ये त्यांचे संक्षिप्त जीवनचरीत्र प्रकाशित केले आहे. १९८४ पासून ते अमेरिकन सोसायटी ऑफ मायक्रोबायलॉजी व सोसायटी फॉर जनरल मायक्रो बायलॉजी इंग्लंड चे सभासद आहेत. अनेक भारतीय प्रतिष्ठित नियतकालीकाचे ते सभासद आहेत. असोशिएशन ऑफ मायक्रोबायलॉजिस्ट ऑफ इंडिया, इंडीयन सायंन्स कॉंग्रेस, मार्क्युसच्या हुज हू ऑफ वर्ल्ड (२००१) मध्ये त्यांचे नाव प्रकाशित आहे. पीअर याच संस्थेने २००२ मध्ये परत त्यांचे नाव समाविष्ट केलेले आहे. भारतातील व परराष्ट्रातील अनेक पीअररिव्हूव्ड जर्नल्सच्या संपादक मंडळात त्यांनी कार्य केलेले आहे.

राज्य व केंद्राच्या अनेक सल्लागार समित्यावर त्यांनी कार्य केलेले आहे. सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ, सीएसआर आणि डीएसटी भारत सरकार येथील त्यांचे कार्य उल्लेखनिय आहे. अनेक नामांकित संस्थामध्ये त्यांनी काम केलेले असुन पुणे विद्यापीठात त्यांनी अभ्यासक्रम मंडळाचे सदस्य (१६९७-२०००, २००५-२००७) चेअरमन, मेंबर सूक्ष्मजीवशास्त्र, १९९७-२०००,

आणि २००० ते २००५ तसेच मेंबर, ऑफ सायंस फॅकल्टी म्हणून १९९७ ते २०००, ते २००५ बीयुटीआर सूक्ष्मजीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान जीवशास्त्रच्या अभ्यासमंडळात कार्य केले आहे.

केंद्रीय विद्यापीठ पाँडेचरी २००१-२००३, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येते मायक्रोबायलॉजी व मॉल्युक्युलर मायक्रोबॉयोलॉजी, बायलॉजी मध्ये मेंबर, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे बीओस लाईफ सायंसेस चे सदस्य म्हणून १९९४ ते १९९९, भारती विद्यापीठ पुणेचे सदस्य, फॅकल्टी ऑफ सायंन्स २०१३-२०१८, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे मेंबर फॅकल्टी ऑफ सायंस १९९०-१९९९ सीएसआयआर आणि डीएसटी भारत सरकार यांच्या निवड समितीवर कार्य केलेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य महोत्सव समारंभ समितीचे सदस्य २०१५-२०१६ म्हणुन कार्यरत आहेत.

युजीसी नवी दिल्ली च्या अनेक कमेटीवर त्यांनी सदस्य म्हणून कार्य केलेले आहे. ११ व्या नियोजन संशोधन समितीचे सदस्य, रिसर्च प्रोजक्ट समितीचे अध्यक्ष आणि अभिमत विद्यापीठे दर्जा बाबत २००८ मध्ये समितीचे सदस्य, आंतरराष्ट्रीय ट्रॅव्हल ग्रांटस २००८-२०१३ समितीचे सदस्य, सेट परीक्षांचे मायाक्रोबायलॉजी विषयाचे चेअरमन महाराष्ट्र शासन आणि गोवा शासन नियुक्त १९९७-२००० यांच्यासह त्यांनी आनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय वैज्ञनिक संस्थामध्ये विशेष उल्लेखनीय कार्य केलेले आहे, विद्यापीठाच्या प्रशासनात गत ३३ वर्षापेक्षा अधिक काळा त्यांनी विविध पदावर कार्य केलेले आहे.

पुणे विद्यापीठात त्यांनी बीओएस चेअरमन, विकास, वित्त, परीक्षा, प्रशासन संदर्भातील समित्यामध्ये सदस्य म्हणून कार्य केलेले आहे. रिसर्च आणि टेक्नीकल कमीटीचे सदस्य म्हणून राज्य संलग्नीत व केद्रीय विद्यापीठांमध्ये कार्य केलेले आहे. पुणे विद्यापीठात डीबीटी पोटेंशिअल एक्सलंस प्रोग्राम अंतर्गत सूक्ष्म जीवशास्त्र विभागास समन्वयक म्हणून कार्य केलेले आहे. भारत सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलाजी चे प्रतिनिधी म्हणून रिलांन्स इंडस्ट्रीज लि. मुंबई या संस्थेत नियुक्त सदस्य म्हणून कार्यरत आहेत, तसेच बायोरिफायनरी सोमय्या ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज, कर्नाटक आणि आगरकर रिसर्च इंस्टीटयुट, पुणे येथे सुध्दा डिवीटी नियुक्त सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

प्रोफेसर बी. ए. चोपडे यांच्या सक्षम शैक्षणिक व प्रशासकिय नेतृत्वामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळालेली आहे. ५ ऑगस्ट २०१५ रोजी सर्वे ऑफ इंडीया टुडे ने भारतातील एकून ८०० विद्यापीठास १८ वा रँक दिलेला आहे व पश्चिम भारत क्षेत्रात ३ रा रँक दिलेला आहे. इंडीयन रँकींग २०१६, नॅशनल इंस्टीटयूट रँकीग फ्रेमवर्क एमआरआयएफ नवी दिल्ली अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास देशात ८७ वा रँक मिळालेला आहे. मे २०१६ रोजी द विक्र याच्यातर्फे प्रकाशित केलेल्या इन्सा रिसर्च सर्वेनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र विभागास युजीसी चा एसएप कार्यक्रमासाठी २०१६ मध्ये निवड झालेली आहे. तसेच अर्थशास्त्र, समाजशास्त्र व राज्यशास्त्र या विभागात युजीसी दिल्लीचे सेंटर ऑफ एक्सलंसी रुरल डेव्हलपमेंट केंद्र म्हणून मान्यता मिळालेली आहे. यामुळे आपले विद्यापीठ पोटेंशिअल एक्सलंसी मिळविण्यासाठी सक्षसम असल्याचे सिध्द झालेले आहे. तसेच द विक या नियतकालीकाने जून

२०१६ या वर्षी केलेल्या हंन्सा विक सर्व्हे ऑफ बेस्ट युनिव्हरसिटी इन इंडिया सर्वेक्षणानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास देशामध्ये ५५ वा रँक मिळालेला आहे तर पश्चिम भारतातील असलेल्या २० विद्यापीठामध्ये ११ वे स्थान प्राप्त झालेले आहे. हि फारच अभिमानाची गोष्ट आहे. विद्यापीठाची ही एक लक्षणीय वाटचाल निश्चितच आशादायी आहे असे म्हणावे लागेल.

प्रोफेसर चोपडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु या नात्याने उत्कृष्ट संशोधन, अध्यापन व नवोपक्रम असणारे भारतातील एक अग्रगण्या विद्यापीठ म्हणुन नावारुपास आणावयाचे आहे. याच दृष्टीने या विद्यापीठास जागतिक किर्तीचे विद्यापीठ म्हणून विकसित करण्याच्या धेयाने त्यांची वाटचाल चालु आहे.